**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २७.०५.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर, परिमंडळ क्र. ५ अंतर्गत ८७ गुन्हेगारांवर प्रतीबंधक कारवाई :-**

पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर परिमंडळ क्र. ५ अंतर्गत येणारे पोलीस ठाणे यशोधरानगर, कळमना, पारडी, वाठोडा व भांडेवाडी हददीत शांतता व सुव्यवस्था कायम व अबाधीत राहावी या उद्देशाने, मा. पोलीस उपायुक्त (परि.क्र.५) श्रीमती अन्नपुर्णा सिंह यांनी त्यांना प्राप्त विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाचे अधिकारा अंतर्गत त्यांचे परिमंडळातील पोलीस ठाणे हद्दीत राहणारे शरिराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे तसेच, अवैधरित्या दारूविक्री करणारे गुन्हेगारांविरूध्द कलम १६३(२) भा.ना.न्या.सं. अन्वये प्रतीबंधक कारवाई करून पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील ३९, पोलीस ठाणे कळमना हद्दीतील १३, पोलीस ठाणे पारडी हद्दीतील ०९, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीतील १०, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतील १६ असे एकुण ८७ गुन्हेगारांवर कारवाई करून, त्यांना दिनांक २७.०५.२०२६ ते दि. २९.०५.२०२६ चे २४.०० वा. पावेतो परिमंडळ क्र. ५ अंतर्गत त्यांचे पोलीस ठाणे हद्दीत राहण्यास प्रतीबंध करण्यात आलेला आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कपीलनगर :- घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०५.२०२६ चे ०२.३० वा. ते ०३.२० वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, समता नगर परिसरात, एकता बुध्द विहार जवळ एक ईसमांवर संशय आल्याने त्यास थांबवुन त्यांस त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्यांचे नाव, विशाल किरण शेंडे, वय २१ वर्षे, रा., समता नगर, गजभिये चे घरी किरायाने, कपीलनगर, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत खिशात ०१ लोखंडी चाकु किंमती १००/-रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन संशयीतरित्या फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कपीलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह. का., सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हिंगणा :- प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०५.२०२५ चे १७.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे बाबाराव आनंदराव भगत, वय ६५ वर्षे, रा. वार्ड नं. २, मोंढा, ता. हिंगणा, जि. नागपूर हे त्याचे सायकलने पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत मोंढा गावाकडुन हिंगणाकडे जात असताना संकल्प व्यसनमुक्ती केंद्राजवळ त्यांचे मागुन येणाऱ्या टिव्हीएस १०० दुचाकी वाहन क्र. एम.पी. ०४ झेड.एफ. २७३३ चा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांचे सायकलला मागुन धडक देवुन पळुन गेला.

गंभीर जखमी फिर्यादीचे वडील यांना उपचाराकरीता हिंगणा ग्रामीण रूग्णालय येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यापकरणी फिर्यादी राकेश बाबाराव भगत, वय ३३ वर्षे, रा. वार्ड नं. २, मोंढा, ता. हिंगणा, जि. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोहवा. धिरज गायकवाड ८२०८५४५३८९ यांनी टिव्हीएस १०० वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०५.२०२६ चे ११.०० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, प्लॉट नं. १०६१, वार्ड नं. ३, ढेंगरे ले—आऊट, महादुला, कोराडी, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. सरला सुरेंद्र राऊत, वय ४४ वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन त्यांचे थेरपी सेंटर येथे कामाला गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख १०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,०७,६००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. बडवाईक ७९७२०१२६२२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सक्करदरा</u> :— अ)** दिनांक २७.०५.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, सक्करदरा चौक उड्डाणपुलाखाली एक अनोळखी पुरुष ईसम अंदाजे ५० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

**ब)** दिनांक २७.०५.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग लंगर खान्याचे भिंतीजवळ एक अनोळखी पुरुष ईसम अंदाजे ५५ वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

**क)** दिनांक २७.०५.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग शॉपींग कॉम्प्लेक्सचे पाठीमागील गल्लीमध्ये एक अनोळखी पुरुष ईसम अंदाजे ६० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. तिन्ही मृतकांची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतक ईसमांना ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सक्करदरा येथे संपर्क साधावा.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून, पोलीस ठाणे सक्करदरा येथे मपोउपनि. अश्वीनी कात्रे ९४०५१६९४७० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे अजनी</u> :—** वासुदेव पांडुरंग गोहणे, वय ६२ वर्षे, रा. संगम टॉकीज जवळ, शिवनगर, तिरंगा चौक, नागपूर हे दिनांक ०९.०५.२०२६ चे ०४.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील सुपर हॉस्पीटल येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ३ इंच, केस— समोरून टक्कल

पडलेले व पांढरे, डोळे–काळे, अंगात– पिवळ्या रंगाचा रेघाटी शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेले आहे. भाषा– मराठी व हिंदी बोलतात.



वासुदेव

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३२४१५३९ /२००३ | कलम ४६९ भा.दं.वि. | सुभाष पुरणचंद अग्रवाल, रा. हनुमान गल्ली, सिताबर्डी, नागपुर. | ०२.०६.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३२४०२०९ /२००३ | कलम ३५९, ३४ भा.दं.वि. | १) सुरज वासुदेव चव्हाण, रा. जोशी नगर, सुयोग नगर चौक, रिंगरोड, अजनी, नागपुर. २) सलम खान पठाण मोहम्मद खान पठाण, रा. आदीवासी प्रकाश नगर झोपडपट्टी, छोटा ताजबाग, सक्करदरा, नागपुर. | ०१.०६.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३०४०३६४ /१९९९ | कलम ४६९ भा.दं.वि. | दरवेश किसन रंगारी, रा. जाटतरोडी नं. २, ईमामवाडा, नागपुर. | ०५.०६.२०२६ |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३२४००८५ /२००२ | कलम ४६१, ३४ भा.दं.वि. | १) दिलीप शामराव सोळंके, २) हिरालाल छेदीलाल करीकांत, दोन्ही रा. वसंतराव नाईक झोपडपट्टी, नागपुर. | ०१.०६.२०२६ |
| ५. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३०४०००६ /२००१ | कलम ३६९, ४११ भा.दं.वि. | १) रमेश प्रल्हाद सोनारे, रा. आंबेडकर नगर, धरमपेठ. २) दिलीप शामराव सोळंके, रा. वसंतराव नाईक झोपडपट्टी. | ०१.०६.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**